वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-बुधवार दि. २५ जून २०२५ पाने ४ किंमत ३

# अजितदादा,त्या तुमच्या लाडक्या संग्राम जगतापला आवरा

# ते लईच मनात मुस्लिम द्वेष ठेवून फालतूची बडबड करू लागलंय

# संग्राम जगतापला एवढी कुमकुमी कशाची?



Email.- dailydivyawarta@Gmail.com
Email.-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

## अहमदनगर येथील मुस्लिम मतदारांनी यापुर्वी त्यांना मतदान करून आमदार केले हे कसं विसरता येईल

### अजित पवार यांच्या राष्ट्रवादीमधील मुस्लिम पुढारी एवढे लाचार का?

## संग्राम जगताप असंच फालतुची बडबड करू लागले तर येणाऱ्या स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीत राज्यात मुस्लिम समाज राष्ट्रवादीचा सुपडा साफ करेल

### अजित पवारांकडे संग्राम जगताप यांची पक्षातून हकालपट्टी करण्याची मागणी करा

## दादा, जगतापांना आवरा नसता निवडणूकीत परिणाम भोगावे लागतील

**आ.इद्रिस नायकवडी,आ.सनाम मलीक, मंत्री हसन मुश्रीफ, मा.मंत्री नवाब मलिम, सलिम सारंग, वसीम बुरहान, मा.आ.जिशान सिद्दीकी, नसीम सिद्दीकी, फारूकपटेल यांनी आता अजित पवारांकडे तक्रार करणे गरजेचे**

## सलीम सारंग यांनी केली अजित पवार अन् सुनील तटकरे यांच्याकडे पत्राद्वारे तक्रार



बीड, (दिव्य न्युज):- उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे त्यांचाच पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार संग्राम जगताप यांच्या विरोधात तक्रार केली आहे. महत्त्वाचं म्हणजे ही तक्रार इतर कोणी नाही तर त्यांच्यात पक्षातील नेत्यांनी केली आहे. संग्राम जगताप सातत्याने मुस्लिम समाजाविरोधात आक्षेपार्ह वक्तव्य करत आहेत, त्यांना आवरावं अशी मागणी तक्रारीच्या माध्यमातून करण्यात आली आहे. यानंतर अजित पवारांनी या तक्रारीची दखल घेतली असून, पक्षाच्या बैठकीत आमदारांना स्पष्ट इशारा दिला आहे. पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष सलीम सारंग यांनी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांना तक्रार करणारं पत्र पाठवलं आहे. यापूर्वी देखील वारंवार संग्राम जगताप यांच्याकडून मुस्लिम समाजाबाबत वादग्रस्त वक्तव्यं केली जात आहेत. त्यांना वेळीच आवरलं नाही तर मुस्लिम समाज विरोधात जाण्याची शक्यता पत्रातून वर्तवण्यात आली होती. एकीकडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष धर्मनिरपेक्ष पक्ष असल्याचं अजित पवारांनी विधान केलं असताना संग्राम जगताप यांची विधानं त्यांची डोकेदुखी वाढवण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे अजित पवारांनी बैठकीला बोलावून

▶▶ पान २ वर

## बीडसह राज्यात राष्ट्रवादीचे अनेक नेते पण एकट्या सलीम सारंग यांनी हिंमत केली

अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे आ.संग्राम जगताप यांनी जाहीर सभेतून मुस्लीम समाजाविषयी अपशब्द वापरल्याने राज्यभरातील मुस्लीम समाजातून तिव्र संताप व्यक्त होऊ लागला आहे. प्रत्येकजण पक्षाध्यक्ष अजितदादांवर नाराजी व्यक्त करू लागला आहे. मात्र राष्ट्रवादीतील बीडसह राज्यातील एकाही नेत्याने किंवा पदाधिकाऱ्याने या विषयी साधा निषेध सुध्दा केला नाही, तक्रार तर दुरच अशा परिस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष सलीम सारंग यांनी एकट्याने हिंमत करून समाजाची बाजू घेत पक्षाध्यक्ष अजितदादांसह प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांच्याकडे तक्रार करून संग्राम जगतापांना वेळीच आवरलं नाही तर मुस्लीम समाज विरोधात जाण्याची शक्यता वर्तवली एवढेच नव्हे तर त्यांच्याविरूध्द कारवाई करा अशी मागणी सारंग यांनी केली. पक्षाचे पदाधिकारी असतांनाही सारंग यांनी घेतलेली भुमिका योग्य आणि समाजाला न्याय मिळवून देणारी आहे.

### सग्राम जगताप यांचं आणखी एक वादग्रस्त विधान

## औरंगजेबाचं गुणगान गाणाऱ्यांची डीएनए टेस्ट करावी लागेल

अहमदनगर, (दिव्य न्युज):- औरंगजेबाचं गुणगान गाणाऱ्यांची डीएनए टेस्ट करावी लागेल असं आमदार संग्राम जगताप यांनी म्हंटलं आहे. माजी आमदार आसिफ शेख यांच्याबाबत संग्राम जगताप यांनी हे विधान केलं आहे. औरंगजेबाचं गुणगान करणाऱ्यांनी भारत सोडून पाकिस्तानात जावं असंही जगताप यांनी म्हंटलं आहे.

यावेळी बोलताना संग्राम जगताप म्हणाले की, औरंगजेबाची पैदाईश भारतीय नव्हती. त्याची वंशावळ परकीय होती. त्यामुळे जो भारतातला आणि महाराष्ट्रातला मुस्लिम धर्मीय आहे, त्याला औरंगजेबाची विचारसरणी मान्य होऊ शकत नाही. औरंगजेबाचं उदात्तीकरण करणारे लोक कधीच भारतीय मुस्लिम होऊ शकत नाही. त्यामुळे याचाही डीएनए टेस्ट करावा लागणार आहे की हा कुठली व्यक्ति आहे, असं वादग्रस्त विधान जगताप यांनी केलं आहे. त्यांच्या या धार्मिक वादग्रस्त विधानामुळे अजित पवारांची मात्र चांगलीच डोकेदुखी वाढली आहे.

## जातीय द्वेषातून उधळलेल्या सोमय्यांना उपमुख्यमंत्री पवारांनी घातली वेसण

### अनाधिकृत भोंग्यावर कारवाई करा पण चुकीचा मार्ग वापरु नका

मुंबई । किसान न्युज

मशिदींवरील अनधिकृत भोग्यांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. मुंबईसह राज्यातील मशिदीवरील भोग्यांविरोधात कारवाईची मागणी करण्यात येत आहे. तर वारीस पठाण हे पण या वादात उतरले आहेत. दरम्यान मुंबईत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली अनधिकृत

▶▶ पान २ वर



### मठात मध्यरात्री जोरदार राडा

## स्वामींच्या खोलीत रात्री महिलेला बघितल्यानं गावकऱ्यांनी घातला गोंधळ



मुंबई, (दिव्य न्युज):- बेळगावच्या शिवापूर गावातील सिद्धेश्वर मठातून एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. रात्रीच्यावेळेस मठात अडवी सिद्धराम स्वामी यांना महिलेसोबत रंगेहाथ पकडलं. गावकऱ्यांना याची माहिती मिळताच त्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. १० ते १५ जणांनी मिळून स्वाजींना याचा जाब विचारला. तसेच मठाबाहेर एकच गोंधळ घातला. या घटनेनंतर पोलिसांनी तातडीने धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. या घटनेनंतर स्वामीजींना तातडीने मठातून हकालपट्टी केली.

घटनेच्या दिवशी एक महिला आपल्या मुलीसोबत सिद्धेश्ववर मठात पोहोचली. रात्री उशीरा एका गावकऱ्याला स्वामीजींच्या खोलीत महिला आणि तिची मुलगी दिसली. त्याने ही माहिती गावकऱ्यांमध्ये पसरवली. गावातील लोकांनी तातडीने मठाच्या दिशेनं धाव घेतली. ग्रामस्थांनी मठाचा दरवाजा तोडत स्वामीजींना याचा जाब विचारला. तसेच महिला आणि लेकीजवळ घेराव

▶▶ पान २ वर

## सुदर्शन घुले गँग लीडर, पण वाल्मीक कराड सूत्रधार

### सुदर्शन घुले गँग लीडर, पण वाल्मीक कराड सूत्रधार



बीड, (दिव्य न्युज):- मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात सुदर्शन घुले हा केवळ गँग लीडर होता. वाल्मीक कराड हाच त्यांचा पडद्यामागे असणारा खरा सूत्रधार होता, असा दावा विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी मंगळवारी कोर्टात युक्तिवाद करताना केला.

संतोष देशमुख हत्या प्रकरणाची आज बीडच्या जिल्हा व विशेष सत्र न्यायालयात जवळपास ३ तास सुनावणी झाली. त्यात वाल्मीक कराडच्या वकिलांनी २ तास युक्तिवाद केला. तर उज्ज्वल निकम यानी १ तास युक्तिवाद केला. यावेळी केवळ वाल्मीक कराडच्या दोषमुक्तीवर युक्तिवाद झाल्याची माहिती आहे. उज्ज्वल निकम सुनावणीनंतर पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, वाल्मीक कराडने कोर्टात आपला देशमुख यांच्या हत्येच्या कटात कोणताही सहभाग नसल्याचा दावा केला.तसेच आपल्यावर करण्यात आलेली मकोकाची कारवाईही चुकीची असल्याचाही युक्तिवाद केला. पण आम्ही त्यावर जोरदार आक्षेप घेतला. आम्ही कोर्टापुढे त्याच्याविरोधात असणारे पुरावे सादर केले. कटाचा मुख्य सूत्रधार हा नेहमी पडद्यामागे असतो. तो आपल्या कठपुतळ्यांच्या माध्यमातून वाईट कृत्य करतो हे कोर्टाला पटवून दिले. त्यानंतर कोर्टाने ७ जुलैपर्यंत आपला निकाल राखून ठेवला.

वाल्मीक कराडच्या वकिलांचा युक्तिवाद काय?

▶▶ पान २ वर

## दिव्य वार्ता — कतारमधील अमेरिकेच्या लष्करी तळावर हल्ल्यानंतर रात्री उशिरा युद्धबंदी जाहीर, पण इराण-इस्रायलचे हल्ले सुरूच

### मंगळवारी सकाळी... ट्रम्प यांनी केली युद्धबंदीची घोषणा, म्हणाले संपले युद्ध



**वॉशिंग्टन** | अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मंगळवारी सकाळी ७:३० वाजता (भारतीय वेळेनुसार) 'ट्रुथ सोशल' वर लिहिले की इराण- इस्रायलमध्ये पूर्ण युद्धविराम झाला आहे. तो ६ तासांनंतर लागू होईल. इराणने मंगळवारी दुपारी १:३० वाजता युद्धविराम केला. इस्रायलने १२ तासांनंतर म्हणजे दुपारी १:३० वा. युद्धविराम लागू केला. ट्रम्पनी हा 'बारा दिवसांच्या युद्धाचा' शेवट म्हटले.

### अवघ्या २ तासांनंतर... इराणने डागले इस्त्रायलवर क्षेपणास्त्र, ४ जणांचा मृत्यू



**तेहरान/तेल अवीव** | इस्त्रायलने दावा केला की युद्धबंदी जाहीर झाल्यानंतर अवघ्या २ तासांत इराणने इस्त्रायलवर दोन क्षेपणास्त्रे डागली. इस्त्रायलच्या बेरशेबा शहरात क्षेपणास्त्र हल्ल्यात ४ जणांचा मृत्यू झाला. इराणी माध्यमांच्या वृत्तानुसार इस्त्रायलवर शेवटची क्षेपणास्त्रे सोडण्यात आली. इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची म्हणाले की अद्याप कोणताही औपचारिक युद्धबंदी करार झालेला नाही.

### इस्त्रायलने म्हटले- युद्धबंदीचे उल्लंघन आहे, हल्ला करण्याचे दिले आदेश



**तेहरान/तेल अवीव** | इस्त्रायलच्या अर्थमंत्र्यांनी सोशल मीडियावर लिहिले की, 'तेहरान आता थरथर कापेल.' इराणने प्रथम हल्ला केला, हे युद्धबंदीचे उल्लंघन आहे, म्हणून प्रत्युत्तर देणे आवश्यक आहे. इस्त्रायलचे पंतप्रधान नेतन्याहू म्हणाले, इराणने पुन्हा हल्ला केला तर प्रत्युत्तर दिले जाईल. इराणच्या हल्ल्यांनंतर इस्त्रायलने काही तासांसाठी हवाई क्षेत्र बंद केले.

### ट्रम्प म्हणाले- दोघांनी युद्धबंदी तोडली; नंतर म्हणाले- युद्धबंदी पूर्णपणे अमलात

**वॉशिंग्टन** | ट्रम्प म्हणाले - 'दोन्ही देशांनी युद्धबंदीचा भंग केला. मी इस्त्रायलवर खूप रागावलो.' तथापि, नंतर ते म्हणाले - 'आता युद्धबंदी पूर्ण अमलात आली आहे. इस्त्रायल इराणवर हल्ला करणार नाही. सर्व विमाने परत येतील.' इस्त्रायली पंतप्रधान नेतन्याहू यांनीही ट्रम्पशी चर्चेनंतर मोठ्या हल्ल्यापासून माघार घेतल्याची पुष्टी केली. तत्पूर्वी, ट्रम्पनी ट्रुथ सोशलवर इस्त्रायलला इशारा दिला होता - 'इस्त्रायल, बॉम्ब टाकू नका. ते मोठे उल्लंघन होईल. वैमानिकांना ताबडतोब परत बोलवा.'

# ऑपरेशन सिंधू अंतर्गत इराण अन् इस्त्रायलमधून भारतीय परत भारतात



सरकारच्या सुरू असलेल्या 'ऑपरेशन सिंधू' अंतर्गत, मंगळवारी इराणमधील २१९ आणि इस्त्रायलमधील १६१ अशा एकूण ३८० भारतीय नागरिकांना सुरक्षितपणे नवी दिल्लीत आणण्यात आलं, अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे.









पान ४ वरून

## अवैधरीत्या वाळू वाहतूक

सदर वाळूने भरलेला ट्रॅक्टर एकूण ६०५०००/सहा लाख पाच हजार रुपये मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत , अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पंडकर पोलीस उपविभागीय मिना ,सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज निलंगेकर, उपनिरीक्षक स्वापनिल कोळी,यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक श्याम गायकवाड, गोपनीय शाखेचे विठ्ठल राठोड, भिमसेन जाधव, अमोल अवसरमल, विकास थोरात ,यांनी कारवाई केली आहे.

## रस्त्याच्या कामातील

दिवसांपूर्वी याच ठिकाणी झालेल्या अपघातात मृत्युमुखी पडला. हा अपघात खराब रस्ता, संकेतशून्य कामाचे ठिकाण आणि वाहतुकीच्या व्यवस्थेच्या अभावामुळे झाला असून त्यास प्रशासन, ठेकेदार व शासन जबाबदार आहेत.

डउझख बीड जिल्हा संयोजक सय्यद आबेद अब्बास, सय्यद कलीम इनामदार, तसेच बीड शहर बचाव मंचाचे पदाधिकारी इम्रान खान यांच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांशी भेट घेतली व दुःख व्यक्त केले. त्यानंतर घटनास्थळीही भेट देण्यात आली.

आमची सर्वांची मागणी आहे की या लापरवाहीस जबाबदार असलेल्या प्रशासन, ठेकेदार आणि संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात यावी. जर वेळेत रस्त्याचे काम पूर्ण झाले असते आणि वाहतूक व्यवस्था योग्यरीत्या ठेवली गेली असती, तर इम्रानचा जीव वाचू शकला असता. ही केवळ एका व्यक्तीची गोष्ट नाही, तर संपूर्ण शहराच्या सुरक्षेचा प्रश्न आहे. म्हणून आम्ही खालील मागण्या करतो:

संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांवर हलगर्जीपणाचे गुन्हे दाखल करावेत

रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्यात यावे

वाहतूक पोलीस तैनात करण्यात यावेत

भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी शाश्वत उपाययोजना आखण्यात याव्यात

– सोशल डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया डउझख बीड जिल्हा

– बीड शहर बचाव मंच

# रोहन गलांडे यांच्या अमरण उपोषणाला यश

## सप्ताह कमीटी व नामदेव महाराज भक्तांचे मानले आभार

केज, (दिव्य न्युज):– केज तालुक्यातील चिंचोली माळी येथे ७ जुन ते १६ जुन पर्यंत रोहन दादा गलांडे पाटील यांनी विविध मागण्या साठी अमरण उपोषण केले होते मागण्या अशा होत्या की नागबेट वस्ती ते श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र अतिक्रमण हटवा तर ८० टक्के अतिक्रमण हटविण्यात आले आहे राहीले आहे ते ग्रामपंचायत हद्दीतील ते सुद्धा ७ सात दिवसांत हटविण्यात येईल तसेच काही क्षनीक सुखा साठी दोन चार बांधकामावर स्टे आला आहे ते सुद्धा पावसाळा संपला की हटविण्यात येईल असे जिल्हा परिषद बांधकाम यांनी लेखी दिले आहे महाराष्ट्रातील शेतकरी कर्जमाफी, बँक खात्यावरील होल्ड काढणे, पिकांना हमीभावासाठी कायदा, व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना तात्काळ आर्थिक मदत या विषयावर कलेक्टर यांच्या सोबत रोहन गलांडे यांचे बोलने झाले असून या मागणीसाठी सरकार कडे मागणी केली आहे असे कलेक्टर विवेक जॅक्सन यांनी



म्हटले आहे चिंचोली माळी बाजार स्थळ घरे असल्याने पावसाळा संपला की हटविण्यात येईल असे ग्रामपंचायतने लेखी पत्र दिले,श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र परीसरातील सर्व अतिक्रमण हटवा या मागणीसाठी दोन दिवसांत हटविण्यासाठी सचरवात होईल ,चिंचोली माळी ते हादगाव रोडचे काम तात्काळ सुरू करा या मागणीसाठी काही कालावधी लागनार आहे कारण शासना कडे निधी उपलब्ध नाही ,पाधन रस्ता ५१,५२,५३, ची कॉलीटी कंट्रोल मार्फत चौकशी करण्यासाठी कार्यालयाला कळविण्यात आले आहे तरी चौकशी होईपर्यंत बिल अदा करण्यात येणार नाही असे लेखी पत्र दिले आहे व तसेच काळ्याचा मळा येथील बंधाऱ्यांची चौकशी होईपर्यंत बिल अदा करण्यात येणार नाही असे लेखी पत्र देण्यात आले आहे तरी अशा प्रकारे रोहन गलांडे पाटील यांच्या अमरण उपोषणाला यश आले आहे आहे असे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे तसेच प्रशासनाच्या वतीने आमरण उपोषण मागे घेतले यावेळी माजी आमदार पृथ्वीराज साठे, तहसीलदार गिट्टे साहेब ,बंडु गव्हाणे, डिप्टीइंजिअर मिसाळ साहेब सप्ताह कमीटीचे आध्यक्ष विजय माने, संजय महाराज नखाते, विजय गायकवाड ,लक्षीमन तात्या गलांडे, गौतम बापु गलांडे, आकाश नखाते, अनिल गलांडे, विजय गलांडे, महादेव गलांडे,राहुल नखाते,सह सर्व गाडेओढनारी भक्त व सर्व श्री संत नामदेव महाराज भक्त, गावकरी उपस्थित होते .

पान १ वरून

## सलीम सारंग यांनी

स्पष्टपणे नाराजी व्यक्त केली. एकीकडे धर्मनिरपेक्ष पक्ष म्हणून आपण पुढे जात असताना एखाद्या धर्माबाबत वादग्रस्त किंवा आक्षेपार्ह विधान पक्षातील आमदाराने करणे पक्षाला परवडणारे नाही असं अजित पवार म्हणाले. संग्राम जगताप यांच्यासारखी कृती खपवून घेणार नसल्याची अजित पवारांनी स्पष्टोक्ती मांडली. आपण स्वत संग्राम जगताप यांच्याशी बोलणार असून अशा प्रकारची वादग्रस्त विधाने का करत असल्याचा जाब विचारणार असल्याची माहिती अजित पवारांनी दिल्याची सूत्रांची माहिती दिली.

## जातीय द्वेषातून

भोंग्याच्या संदर्भात बैठक संपली. त्यावेळी दादांनी भाजप नेते किरीट सोमय्यांना स्पष्ट शब्दात समज दिली. यामुळे जातीय द्वेषातून उधळलेल्या सोमय्यांना अजित पवार यांनी वेसण घातल्याची चर्चा राज्यात सुरु झाली

आहे. अजित पवारांनी किरीट सोमय्यांना मशिदीत जाऊ नये असं स्पष्ट शब्दात सांगितलं. त्यांच्या मशिदीत जाण्यामुळे कायदा सुव्यवस्था प्रश्न निर्माण होऊ शकतो असे दादांनी स्पष्ट केले. किरीट सोमय्या हे काही ठिकाणी मशिदीत जात असल्याचे समोर आले होते. मशिदीवरील भोंग्यासंदर्भात सोमय्या यांनी यापूर्वी सुद्धा आंदोलन केले होते. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सुद्धा मशिदीवरील भोंग्याविरोधात भूमिका घेतली होती. त्यानंतर राज्यात आंदोलनं पेटलं होते. तर काही बॉलिवूड सेलिब्रिटी, गायकांनी सुद्धा भोंग्यांविरोधात समाज माध्यमांवर मत व्यक्त केलं होतं. अनधिकृत भोंग्याच्या संदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आजच्या बैठकीत एक निर्णय घेण्यात आला. पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला आणि मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती बैठकीला हजर होते. बैठकीत पोलीस आयुक्त देवेन भारती यांनी उच्च न्यायालयाने घातलेली ४६ ते ५६ डेसिबल आवाज मर्यादा पालन होऊच शकत नाही याच प्रात्याक्षिक दाखवलं. बैठकीत बसलेल्या लोकांचा आवाज देखील ४६ डेसिबल पेक्षा जास्त आहे, याचं प्रात्याक्षिक देवेन भारती यांनी अजित पवारांना करून दाखवलं. अजित पवारांकडून पोलीस आयुक्त आणि पोलीस महासंचालक यांना नियमांची पायमल्ली करणार्यांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले. मात्र कुठेही चुकीच्या पद्धतीने कारवाई नको असं स्पष्ट शब्दात सांगितलं.

राजकारण न करता शंभर टक्के भोंगे बंद व्हायला हवी

भोंग्यांच्या आडून भाजपा राजकारण करीत असून, त्यांना खरंच भोंगे बंद करायचे आहे की, राजकारण हे समजत नसून भोंग्यांचा प्रश्न विनाकारण मुस्लिमांशी जोडून ते राजकारण करीत आहेत. किरीट सोमय्या सारखे नेते त्यात तेल टाकीत आहेत. यामुळे हा कोणत्याही एका जातीचा अथवा धर्माचा हा प्रश्न नसून यातून आधी भाजपाने बाहेर पडावं आणि राज्यातील शंभर टक्के भोंगे बंद करावेत. जेंव्हा शंभर टक्के भोंगे बंद होतील तेंव्हाच हा प्रश्न निकाली निघणार आहे. पण हा प्रश्न निकाली न काढता चर्चेत ठेवून सत्ताधारी ओटबँकचे राजकारण करीत आहे. अशी चर्चा सुरू असून, शासनाने शंभर टक्के भोंगे बंद करावेत अशी मागणी करण्यात येत आहे.

## सुदर्शन घुले गँग लीडर

वाल्मीक कराडचे वकील आच्या सुनावणीत युक्तिवाद करताना म्हणाले की, प्रस्तुत प्रकरणात ३ वेगवेगळे गुन्हे आहेत. प्रत्येक एफआयआरचे वेगवेगळे आरोपपत्र दाखल झाले पाहिजे. वाल्मीक कराडचा मकोकाशी कोणताही संबंध नाही.

त्यांचा गुन्हा व एफआयआर वेगळा आहे. ६ डिसेंबर रोजी वॉचमन सोनवणे यांना मारहाण झाली. या घटनेचा खंडणीशी कोणताही संबंध नाही. या प्रकरणात शिवराज देशमुख हा मुख्य फिर्यादी आहे. त्याच्या जबाबात वाल्मीक कराडचे कुठेही नाव नाही. १५ जानेवारी २०२५ रोजी वाल्मीक कराडला हत्या प्रकरणात आरोपी करण्यात आले.

प्रस्तुत प्रकरणात अण्णा म्हणजे वाल्मीक कराड हाच असे नाही. संतोष देशमुख यांनाही अण्णा म्हणूनच बोलावले जात होते. पण वाल्मीकलाच अण्णा म्हणून आरोपी करण्यात आले. सीआयडीने मांडलेले मत हे त्यांचे आहे. या प्रकरणी पोलिस तपास गरजेचा होता, असे ते म्हणाले.

उज्ज्वल निकम यांनी काय केला युक्तिवाद?

उज्ज्वल निकम यांनी वाल्मीक कराडच्या वकिलाचा युक्तिवाद जोरकसपणे फेटाळून लावला. ते म्हणाले. या प्रकरणी संपूर्ण केसचा हेलिकॉप व्ह्यू घ्यावा लागले. आरोपींनी आवादा कंपनीला २ कोटी मागितले. या संपूर्ण प्रकरणात वाल्मीक कराड हा पडद्यामागे असणारा दिग्दर्शक होता. संतोष देशमुख यांनी आपल्या निकटवर्तीयांना ही गोष्ट सांगितली होती. त्याचे डिजिटल पुरावे पुरेसे आहेत. या घटनेनंतर वाल्मीक कराड व विष्णू चाटे अस्वस्थ झाले. त्यांनी नुसती मारामारी काय करता? असा अप्रत्यक्ष संदेश सुदर्शन घुले व इतरांना दिला.

प्रस्तुत प्रकरणात सुदर्शन घुले हा गँग लीडर आहे. पण पडद्यामागे वाल्मीक कराड ह खरा सूत्रधार आहे. या प्रकरणात तपास पोलिसांनी नाही तर सीआयडीच्या तज्ज्ञ टीमने केला आहे, असे ते म्हणाले.

## स्वामींच्या खोलीत रात्री

घातला. त्यांच्यासोबत असभ्य वर्तन केलं.

यावेळी मोठ्या संख्येनं ग्रामस्थांनी धाव घेतल्यामुळे खोलीत असलेली महिला आणि मुलगी प्रचंड घाबरली. यादरम्यान, काहींनी व्हिडिओ शूट करून शेअर केला. मठाजवळ मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ जमा झाल्यामुळे पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. तसेच गावकऱ्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला. यावेळी स्वामीजींनी, आपण कोणतंही चुकीचं काम केलं नसल्याचं सांगितलं. महिला आणि मुलगी दूर गावावरून आले असल्यामुळे त्यांना मठात आश्रय दिला असल्याचं त्यांनी सांगितलं.या घटनेनंतर पोलिसांनी महिला आणि तिच्या लेकीला सांत्वन केंद्रात हलवले. दुसऱ्या दिवशी स्वामी आणि ग्रामस्थांमध्ये बैठक पार पडली. या बैठकीस ग्रामस्थांनी स्वामींना मठ सोडून जाण्यास सांगितले. अखेर ग्रामस्थांचा रोष पाहून स्वामींनी मठ सोडल्याची माहिती समोर आली आहे.